ePaper

## सुप्रिया सुळे, बजरंग सोनवणे यांनी घेतली अमित शाह यांची भेट!

वर्ष - 8 । अंक - 241 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™

### आतील पानांत


- चहलच्या घटस्फोटावर शिक्कामोर्तब
- भारतीय संघाला कोट्यवधींचं बक्षीस
- छत्तीसगडमध्ये ३० नक्षलवादी ठार!
- सक्षम महिलांनी पोटगी मागू नये!


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 21 मार्च 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दिशा सालियनचे वडील सतीश 'ॲक्शन मोड' मध्ये : घेतली कोर्टात धाव

# भूत मानगुटीवर, आदित्य लटकणार?

## वकील म्हणतात, आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनू मोरिया, रोहन राय उपस्थित!

। मुंबई / पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज

**प्रसिद्ध अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची सहकारी म्हणजे व्यवस्थापिका दिशा सालियन हिच्या खूनप्रकरणी तिचे वडील पाच वर्षानंतर 'ॲक्शन मोड' मध्ये आल्यामुळे आणि त्यांनी तपासासाठी कोर्टात धाव घेतल्यामुळे राजकीय वातावरण अतिशय चिघळले आहे. या मुद्द्यावर विधान परिषदेत हमरी तुमरी झाली.**



### सामूहिक बलात्कार शब्द गाळला !

दिशा सालियन हत्येप्रकरणी नेमण्यात आलेल्या 'एसआरटी' चा अहवाल प्रसिद्ध करा, या मागणीवरून मुद्दा तापला. तिच्या मूळ पोस्टमार्टम मध्ये असलेला सामूहिक बलात्काराचा मुद्दा वगळण्यात आल्याचा आरोपही झाला. उंच इमारतीवरून पडून दिशाचा मृत्यू झाला, असे नमूद करण्यात आले असले तरी ती ज्या ठिकाणी पडली होती, तेथे रक्ताचा टिपूसही दिसला नाही. शिवाय, त्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे चोरीला गेल्याचेही सांगण्यात आले. या वास्तवावर वार-पलटवार झाले.

### खून प्रकरणाला वेगळे वळण

दिशा सालियन खूनप्रकरणाला नवीन वळण मिळण्याची दाट शक्यता आहे. दिशाच्या वडिलांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. मुंबईत २०२० मध्ये दिशाचा इमारतीवरुन पडून मृत्यू झाला होता. पण, हे प्रकरण घडल्यानंतर पाच वर्षांनी, सामूहिक बलात्कार करुन दिशाची हत्या केल्याचा गंभीर आरोप तिच्या वडिलांनी केला आहे. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

### आदित्य ठाकरे यांचे थेट नाव..

याप्रकरणी, आमदार आदित्य ठाकरेंविरोधात गुन्हा नोंदवण्याची मागणी सुद्धा त्यांनी केली आहे, हे प्रकरण त्यामुळे आदित्य यांच्या अंगलट येऊ शकते.

### दिशा खूनप्रकरण काय?

सुशांतसिंह राजपूतच्या व्यवस्थापिका असलेल्या दिशा सालियनचा मृत्यू सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूच्या काही दिवस आधीच झाला होता. दिशाचा मृत्यू दि. ८ आणि ९ जून २०२० च्या रात्री दोन वाजण्याच्या सुमारास एका इमारतीच्या चौदाव्या मजल्यावरून पडून झाला. त्यानंतर, फक्त पाच दिवसांनी म्हणजे दि. १४ जून २०२० रोजी सुशांतसिंह राजपूत आपल्या घरात मृतावस्थेत आढळला होता.

### 5 दिवसाच्या अंतराने मृत्यू

दोघांच्या मृत्यूच्या या घटनांना अत्यंत गांभीर्यपूर्वक अनेकांनी एकत्र जोडले. दोन मोठ्या प्रसिद्ध व्यक्तींचा मृत्यू एकाच काळात घडणे, एक मोठा योगायोग होता. दिशाच्या मृत्यूनंतर दोन दिवसांनी तिच्या मृतदेहाचे पोस्टमॉर्टम झाले आणि अहवाल आला. मात्र, तिच्या पोस्टमॉर्टमसाठी जाणूनबुजून वेळ लावण्यात आला का? असा सवालही त्यावेळी उपस्थित करण्यात आला होता.

### दिशाच्या वडिलांचे आणि वकिलांचे गंभीर आरोप..

दिशा सालियनचे वडील सतीश आणि वकील ॲड. नीलेश ओझा यांनी अतिशय गंभीर आरोप केले असून त्याचे भक्कम डिजिटल पुरावे असल्याचे म्हटले आहे. ही घटना घडली त्यावेळी आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनो मोरिया आणि रोहन राय यांच्या मोबाईलचे लोकेशन, तेथील सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यास खुनाचा उलगडा होईल,असे त्यांचे म्हणणे आहे. दिशावर सामूहिक बलात्कार करून तिचे तोंड बंद करण्यासाठी गळा दाबून खून केला आणि इमारतीवरून उडी मारण्याचे भासवून मृतदेह खाली आणून ठेवला. पण, कोठेही रक्ताचे व्रण सापडले नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे.

### पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये काय?

पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये, डोक्यावरील आणि शरीरावरील अनेक जखमांमुळे दिशाचा मृत्यू झाल्याचे समोर आले. पण, रिपोर्टमध्ये दिशावर अत्याचार झाल्याचे कोणतेही पुरावे सापडले की नाही ? यावरुन सुद्धा वेगवेगळे दावे करण्यात आले होते. दिशाच्या गुप्तांगावर कोणत्याही जखमा नसल्याचे सुद्धा पोस्टमॉर्टममध्ये सिद्ध झाले. मृत्यूपूर्वी तिच्यावर छळ झाल्याचा दावा तपास यंत्रणांनी फेटाळून लावल्याचेही सांगण्यात आले.

### आदित्य ठाकरेंचे कनेक्शन?

दिशा सालियनच्या मालाडमधील घरी दि. ८ जून २०२० ला पार्टी सुरु होती. दिशाचा होणारा पती रोहन राय आणि जवळची मंडळी या पार्टीत उपस्थित होती. थोड्याच वेळात अचानक या ठिकाणी आलेल्या हायप्रोफाईल व्यक्तींमुळे वातावरण बदलले, असा दावा करण्यात येत आहे. या हायप्रोफाईल व्यक्तींमध्ये तत्कालिन मंत्री आदित्य ठाकरे, सूरज पांचोली, दिनो मोरिया यांचा समावेश होता, असे सांगितले जाते. दिशावर अमानुष सामूहिक बलात्कार करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. दिशासमोर पूर्वी झालेल्या एका प्रकरणात दिशाचे तोंड बंद करण्यासाठी तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. या सगळ्यामुळेच आदित्य ठाकरेंचे या प्रकरणाशी कनेक्शन असल्याचे बोलले जात आहे.

### बदनामीचा कट : आदित्य

गेली पाच वर्षे आपल्या बदनामीचा कट आखला जात आहे, असा आरोप आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे. त्यांच्या समर्थनार्थ उद्धव ठाकरे यांनी देखील पत्रकार परिषद घेतली.

### विधिमंडळात हमरी तुमरी..

या प्रकरणावरून विधिमंडळात आज हमरी-तुमरी झाली. सत्ताधारी बाकांवरून प्रवीण दरेकर, संजय शिरसाट, चित्रा वाघ आणि मनीषा कायंदे यांनी प्रचंड आरोप केले. तर विरोधी बाकांवरून अनिल परब, अंबादास दानवे यांनी प्रत्यारोप केले.

## शालेय शिक्षण विभागाचा निर्णय

# राज्यात शाळांमध्ये सीबीएससी पॅटर्न लागू!

### शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची माहिती

। पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना लवकरच सीबीएससी अभ्यासक्रम लागू केला जाणार आहे. महाराष्ट्र बोर्डाच्या शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबतच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भूसे यांनी विधान परीषदेत यासंदर्भात माहिती दिली.**






येत्या 2025-26 या शैक्षणिक वर्षांपासूनच सीबीएससी अभ्यासक्रम लागू करण्याबाबत हालचाली सुरु आहेत. विधान परीषदेत विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भूसे यांनी लेखी उत्तर दिले. भाजप आमदार प्रसाद लाड यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. राज्यातील इयत्ता तिसरी ते बारावीच्या शाळांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या आराखड्याला सुकाणू समितीने मान्यता दिली का? असा प्रश्न आमदार प्रसाद लाड यांनी विचारला होता. सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठी उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. 1 एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. शाळांचे वर्षभराचे वेळापत्रक यंदा कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यामध्ये शिक्षण विभागाकडून अचानक पहिल्या इयत्तेपासून नवव्या इयत्तेपर्यंतची वार्षिक परीक्षा एप्रिलअखेरीस घेण्याची सूचना जारी केली. मात्र या सुचनेमुळे शैक्षणिक वर्तुळात गोंधळ उडाल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या परीक्षा पूर्वीच्या वेळापत्रकानुसारच व्हाव्यात, अशी शिक्षकांसह पालकांची मागणी आहे. त्यातच आता मुंबईतील शाळांमधील मुख्याध्यापकांसमोर या निर्णयामुळे नवा प्रश्न निर्माण झाला आहे. आताच्या नव्या सुचनेप्रमाणे परीक्षा संपवून नवीन शैक्षणिक वर्षातील दहावीचा अभ्यासक्रम कधी सुरू करायचा, असा प्रश्न मुख्याध्यापकांना पडलाय.अनेक शाळांमध्ये इयत्ता दहावीचे वर्ग एप्रिल महिन्यातच घेण्यास सुरु होतात.

सामान्यप्रमाणे नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याआधी दहावीच्या मुलांचे वर्ग सुरु होतात. याच काळात दहावीच्या मुलांचा बराचसा अभ्यासक्रमही पूर्ण करतात. मात्र आता नव्या सुचनेनुसार वार्षिक परीक्षाच 22 एप्रिलपर्यंत सुरू राहणार असून त्यामुळे दहावीच्या या वर्गाचे नियोजन आता करता येणार नाही, अशी खंत शिक्षकांसह पालक आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. मार्चमध्ये परीक्षा आटोपल्यानंतर दहावीच्या विद्यार्थ्यांचा एप्रिलमध्ये पहिल्या पंधरा दिवसांमध्ये काही अभ्यासक्रम पूर्ण केला जातो. जूनमध्ये पुढील अभ्यासक्रम सुरू करून वर्षाच्या शेवटी उजळणीसाठी वेळ मिळतो. मात्र यंदापासून दहावी आणि बारावीच्या परीक्षा दहा दिवस आधीच घेतल्या जात असल्यामुळे पुढील वर्षी देखील या वाया गेलेल्या दिवसांचा फटका बसणार आहे, असे शिक्षकांचे म्हणणे आहे. एप्रिलमध्ये दहावीचे एक्स्ट्रा लेक्चर घेण्याचे नियोजन यंदा फसणार आहे. साहजिकच दहावीचा अभ्यास फेब्रुवारीत परीक्षेआधी संपवायचा कसा, असा पेच निर्माण झाला आहे. या दिवशी सर्व शाळांतील परीक्षा संपणार आहेत.

सर्व इयत्तांच्या परीक्षा घेऊन त्यांचे निकाल अवघ्या पाच दिवसात देणे सर्वच शाळांना अवघड ठरणार आहे. त्यामुळे वार्षिक परीक्षा एप्रिलअखेरीस घेण्याच्या धोरणाबाबत प्रशासनाने पुनर्विचार विचार करावा, अशी मागणी शिक्षक संघटनांबरोबरच पालक आणि विद्यार्थ्यांकडून केली जात आहे.परीक्षा उशिरा घेण्याच्या निर्देशांमुळे शाळांचे वर्षभराचे नियोजन गडबडले आहे.

### निर्णय पुढील वर्षीपासून अंमलात

हा निर्णय पुढील वर्षीपासून अंमलात आणावा, अशी मागणी उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेकडून केली जात आहे. 23 एप्रिलला परीक्षा संपल्यानंतर आठवड्याभरात म्हणजेच 1 मेपासून सुट्टी द्यायची असेल तर चार ते पाच दिवसांमध्ये पेपर तपासणी करुन निकाल विद्यार्थ्यांच्या हातात देणे अतिशय अवघड काम असल्यानेच प्रशासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करावा.

---

## पार्किंगच्या वादातून एकमेकांवर वार

### घटनेचा व्हिडीओ व्हायरल; कोंढवा पोलिसांनी दोघांना केली अटक

। पुणे ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुणे शहरातील कोंढवा भागातील कौसरबाग येथे पार्किंगच्या वादातून दोन तरुणांमध्ये वाद झाल्याची घटना घडली आहे, तर घटनेत दोघांनी एकमेकांवर धारदार शस्त्राने वार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे कोंढवा परिसरात एकच खळबळ उडाली आहे.**



गणेश सुभाष राख पसरे वय ३२, रा. कोंढवा बुद्रुक आणि अफाक शेख ३० वर्ष रा. मिठा नगर, कोंढवा या दोघांमध्ये भांडण झाले; तर या दोघांनी एकमेकांविरोधात तक्रारी दिल्या आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोंढवा येथील कौसरबाग परिसरातील सना हॉस्पिटलसमोर असलेल्या रस्त्यावर गणेश सुभाष राख पसरे याने त्याची कार पार्क केली होती, त्यावेळी तिथे आलेल्या अफाक शेख याच्यासोबत त्याचा वाद सुरू झाला.

काही मिनिटांत दोघांनी एकमेकांना मारण्यास सुरुवात केली आणि त्यावेळी एकमेकांवर धारदार शस्त्राने वार केल्याची घटना घडली. या घटनेमध्ये दोघेही जखमी झाले असून त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे. तर त्या दोघांनी एकमेकांविरोधात तक्रारी दिल्या आहेत. त्यानुसार दोघांना अटक करण्यात आली आहे आणि त्यांच्याकडे अधिक चौकशी केली जात असल्याचे कोंढवा पोलिसांनी सांगितले.पुणे शहरातील कोंढवा भागातील कौसरबाग येथे पार्किंगच्या वादातून दोन तरुणांमध्ये वाद झाल्याची घटना घडली आहे, तर घटनेत दोघांनी एकमेकांवर धारदार शस्त्राने वार केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे कोंढवा परिसरात एकच खळबळ उडाली आहे. गणेश सुभाष राख पसरे वय ३२, रा. कोंढवा बुद्रुक आणि अफाक शेख ३० वर्ष रा. मिठा नगर, कोंढवा या दोघांमध्ये भांडण झाले; तर या दोघांनी एकमेकांविरोधात तक्रारी दिल्या आहेत.

### एकमेकांविरोधात तक्रारी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोंढवा येथील कौसरबाग परिसरातील सना हॉस्पिटलसमोर असलेल्या रस्त्यावर गणेश सुभाष राख पसरे याने त्याची कार पार्क केली होती, त्यावेळी तिथे आलेल्या अफाक शेख याच्यासोबत त्याचा वाद सुरू झाला.पुणे शहरातील कोंढवा भागातील कौसरबाग येथे पार्किंगच्या वादातून दोन तरुणांमध्ये वाद झाल्याची घटना घडली आहे.

## मुळा नदीची अवस्था गटारगंगेची

# नदी प्रदूषणाचा भस्मासूर!

### गटारगंगा सारखी अवस्था : प्रशासन, महायुती सरकारचे दुर्लक्ष

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहराच्या सीमेवर असणाऱ्या मुळा नदीची अवस्था गटारगंगेची झाली आहे. दोन्ही महापालिकांच्या दुर्लक्षामुळे सांडपाणी थेट नदीमध्ये सोडले जात आहे. रसायनयुक्त पाण्यामुळे बुधवारी नदी फेसाळली होती.**



पिंपरी- चिंचवड शहरातून इंद्रायणी, पवना आणि मुळा अशा तीन नद्या वाहतात. मुळा नदी पिंपरी-चिंचवड व पुणे शहराच्या सीमेवरून वाहते. वाकड ते दापोडी असे नदीचे पात्र शहराच्या सीमेवर आहे. या नदीच्या अलीकडे पिंपरी-चिंचवड शहर असून, त्यावर हिंजवडी, वाकड, पिंपळे निलख, सांगवी, नवी सांगवी, दापोडी, बोपखेल परिसर आहे. पुण्याच्या बाजूने बालेवाडी स्टेडियम, बालेवाडी गावठाण, बाणेर, औंध, बोपोडी, दापोडी असा परिसर आहे. या परिसरातील सांडपाणी मोठ्या प्रमाणावर नदीत सोडले जात आहे.

> पिंपळे-निलख येथून वाहत असलेल्या मुळा नदी प्रवाहात मोठ्या प्रमाणात फेस आढळून आला. अनेक कंपन्यांचे दूषित पाणी कोणतेही प्रक्रिया न करता थेट नदीत सोडतात. नदी प्रदूषणाकडे पुणे आणि पिंपरी महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे.
>
> **–रविराज काळे,**
> युवा आघाडी, आम आदमी पार्टी.

#### पाण्याचे नमुने तपासणीसाठी...

रसायनयुक्त पाणी, तसेच मैला सांडपाणी थेट नदीत सोडले जात असल्याने, बुधवारी सकाळपासूनच नदी फेसाळली होती. दुर्गंधी येत होती. या संदर्भातील छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर, त्याची दखल पिंपरी-चिंचवड महापालिका आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने घेतली आहे. पाण्याचे नमुने घेतले आहेत.

---

## नगर भूमापन कार्यालयाच्या कामकाजाची “सूसुत्रता!

### आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड : भूमी अभिलेख कार्यालय ता. हवेली जि. पुणे अंतर्गत येणारी मनपा हद्दीतील काही गावे नगर भूमापन कार्यालय पिंपरी-चिंचवड यांचेशी संलग्न करणेबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश जमाबंदी आयुक्तांना दिले आहेत..**





भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या निमित्ताने राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. यावेळी नगर भूममापन कार्यालयाच्या कामकाजात सूसुत्रता आणण्याबाबत मागणी केली.

महसूल मंत्री बावनकुळे यांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, तहसील हवेली कार्यालयातील काही गावे पिंपरी-चिंचवड ~~महानगरपालिकेच्या हद्दीतील काही~~ गावे यापूर्वी हवेली तहसील कार्यालय अंतर्गत येत होती. मागील काही कालावधीमध्ये सदर गावे अभिलेख सहीत पिंपरी-चिंचवड तहसील कार्यालयाअंतर्गत संलग्न करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे भूमी अभिलेख हवेली कार्यालयातील काही गावे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत असून, सदर गावे नगर भूमापन कार्यालय पिंपरी चिंचवड या कार्यालयाशी संलग्न करण्यात यावे, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली आहे.

#### नागरिकांची पायपीट होणार कमी...

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना जमीन मोजणीकरिता तसेच प्रॉपर्टी कार्ड या कामासाठी हवेली भूमीलेख कार्यालयामध्ये जावे लागते. त्यामुळे नागरिकांची पायपीट होऊन आर्थिक वेळेचे नुकसान होते सर्वांना एकाच ठिकाणी सर्व सरकारी सुविधा मिळण्याकरिता सोयीचे होईल. त्या अनुशंगाने, बोपखेल, दिघी, वडमुखवाडी, चऱ्होली, चोवीसावाडी, डुडूळगाव, मोशी, चिखली, देहु, किन्हई, रावेत, मामुर्डी, किवळे आदी गावे नगर भूमापन अभिलेख पिंपरी-चिंचवड कार्यालयाशी संलग्न करण्यात येणार आहेत.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### माझे - मीपण हेच दुःखाला कारण ।

भीति न बाळगावी चित्ती । रक्षण करणारा आहे रघुपति॥ भीति न बाळगावी कशाची काही। राम रक्षिता आहे हे हृदयी जाणून राही ॥ सर्वस्वी झाल्यास रामाचे । राम उभा राहिला तेथे। काळजीचे कारण न उरे साचे ॥
राम म्हणावा दाता खरा । न द्यावा भीति-काळजीला थारा। काळजी करू नये । प्रयत्न सोडू नये । कोणत्याही कारणाने रामास विसरू नये ॥ म्हणावा प्रपंच रामाचा झाला । मनाने परमात्म्याचे होणे हा उपाय भला । तेथे ठाव नाही काळजीला, तळमळीला॥
देहाशी ठेवता माझे-मीपण । तेच होते दुःखाचे अधिष्ठान॥ आजवर जे जे काही केले। ते ते मीपणाने झाले ॥ जे जे मीपणाने केले । ते ते दुःखाला कारण झाले ॥ बाह्य वस्तु जरी मीपणाने सोडली । तरी अभिमानाने वृत्ति बळावली । तेथेच घाताला सुरुवात झाली॥
आग्रह आणि हट्टीपण । हेच अभिमानाचे लक्षण । कर्तेपणाचा अभिमान । हाच दुःखाला कारण जाण॥ प्रपंचाचे दुःख भोगणे । ते मीपणा असल्याची खूण जाणणे । मी-माझेपणाने जोपर्यंत धडपड जाण। तोपर्यंत नाही समाधान । देहबुद्धीचे प्रेम । स्वार्थाला वाढविते जाण ॥ स्वार्थाचे आपलेपण । हेच घाताला कारण ॥ आजवर जो जो प्रयत्न झाला । तो तो देहबुद्धि वाढवीतच गेला ॥ देहबुद्धीचा भाव । तो मुळीच दुःखाचा ठाव॥ जोपर्यंत आपला नाही देहभाव विसरला । तोवर देहदुःखे पस्तावला गेला ॥ म्हणून देहबुद्धि धरून राही । त्याला कोठे सुख नाही॥ रामाविण अन्य प्रीति। उपजे देहबुद्धीचे संगती॥ म्हणून मीपणाचे न व्हावे अधीन। जेणे भंगेल आपले समाधान । कारण जेथे मीपणाचे ठाणे। तेथे दुःखाचे साम्राज्य असणे ॥ पाप-पुण्याची भीति । ही देहबुद्धीचीच संगति। वासनेत जीव गुंतला । कष्टी फार फार झाला ॥ आजवर वासना पोटी धरून राहिला । आपल्या हिताला नागवला ॥ नदी जशी अखंड वाहते । वासना तशी सारखी वाहते ॥ वासना भोगाने कमी होत नाही । त्यागाने नाहीशी होत नाही ॥ आपण देहधारी । देहदुःख न सोसवे क्षणभरी ॥ ज्याला म्हणावे मी माझे । त्यावर माझी सत्ता न गाजे॥ माझे इच्छेने माझे मलाच ठेवता येत नाही । जगाने माझे इच्छेने वागावे हे म्हणणे खरे नाही ॥ सर्व काही देता येते दान । पण उर्वरित राहतो अभिमान॥
कर्तेपणाचा अभिमान । हेच भगवंताच्या आड मुख्य जाण॥ म्हणून माझे - मीपण । हेच दुःखाला कारण। रामाचे होण्याने होईल निवारण॥

**बोधवचन:- सर्व बंधनाचे दुःखाचे कारण। कर्माचा कर्ता मी होणे जाण॥**



## 'स्टेट'मेंट

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक

**भारतीय वंशांची अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे दोघेही परतीच्या प्रवासासंदर्भातील सर्व प्रकारचे अडथळे दूर करत आता पृथ्वीवर 'लँड' झाले आहेत. पण, त्यांना आता शारीरिक व्याधींचा मोठा सामना करावा लागणार आहे ! सलग नऊ महिने पृथ्वीवरील वातावरणापासून दूर असल्यामुळे शरीरामधील अनेक बदल त्यांना त्रासदायक ठरतात की काय? असा नवीन प्रश्न उपस्थित झाला आहे.**

# सुनीता विल्यम्स पृथ्वीवर, 'लँड' झाली खरी : पण..?



### पहिले संकट 'बेबी फूट'चे..

अंतराळात असल्यामुळे हे दोघे जमिनीवर पाय टेकण्यापासून दूर राहिले. त्यामुळे त्यांच्या पायांची अवस्था अगदी लहान मुलांच्या पावलासारखी झाली आहे. जमिनीचा स्पर्श सहन न होण्यासारखी पायांची स्थिती आहे. त्याचप्रमाणे, नियमित पौष्टिक खाण्यापासून ते नऊ महिने दूर राहिले असल्यामुळे वेगवेगळी प्रोटीन्स शरीराला मिळू शकली नाहीत, त्यामुळे त्यांच्या हाडांची, रक्ताची आणि मासाची अवस्था याची चाचणी सध्या तज्ज्ञ डॉक्टर करीत आहेत. पण, यातून स्थिर होण्यासाठी सुनीताला अजून काही महिने किंवा कदाचित काही वर्षे हे सर्व सहन करावे लागणार आहे.

### नेमके काय घडले ?

सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर या दोन अंतराळवीरांनी दि. ५ जून २०२४ रोजी परीक्षणयान असलेल्या 'स्टार लायनर' मधून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे झेप घेतली होती. त्या ठिकाणी आठ दिवस घालवल्यानंतर आणि ठराविक माहिती गोळा केल्यानंतर ते परतणार होते. मात्र, त्यांच्या अंतराळ यानामध्ये बिघाड झाल्यामुळे हे दोघेही तेथेच अडकून पडले होते. त्यांचा पूर्ण अवकाशाशी संबंध तुटण्याचे पाहून संपूर्ण जगाच्या हृदयाचा ठोका चुकला होता, हे आठवत असेलच!

### शेवट गोड ते सगळे गोड..

सलग नऊ महिने अवकाशात भरकटल्यानंतर भारतीय वेळेनुसार दि. १९ मार्चच्या पहाटे हे दोघे आणि त्यांना आणायला गेलेले अन्य चौघे असे सर्व अंतराळवीर सुखरूपपणे परतले. फ्लोरिडाजवळ समुद्रात त्यांची पॅरॅशूट्स अलगद उतरली आणि सर्वांनी निःश्वास टाकला.

### परतीच्या प्रवासाचा थरार..

थोडा गांभीर्याने विचार केला, तर कोणतीही अंतराळ मोहीम ही जोखमीची, संकटांनी भरलेली असते. त्यात अंतराळात अडकून पडल्यानंतर या दोन अंतराळवीरांबद्दल काळजी वाटणे, अगदीच स्वाभाविक होते. रोजच जीवनमरणाचा प्रश्न, ऑक्सीजन मिळतो का? खायला मिळते का? संपूर्ण जगाचे लक्ष या मोहिमेकडे लागले होते. त्यांच्या थरारक परतीच्या प्रवासाकडे पाहात बसणे, एवढेच पृथ्वीवरील जनतेच्या हातात होते.

### ..अशी झाली मोहीम फत्ते !

सर्व प्रकारचे अडथळे दूर करत तब्बल नऊ महिन्यांनंतर त्यांना परत आणण्यासाठी स्पेस-एक्स 'ड्रॅगन फ्रीडम' च्या लँडिंगसाठी समुद्रातल्या आठ लँडिंग साईट्स ठरवण्यात आल्या होत्या. फ्लोरिडाच्या समुद्रात होणारा अमेरिकेच्या पूर्व किनारपट्टीवरचा हा शेवटचा 'स्प्लॅश डाऊन' होता.

### 'हीट- शिल्ड'चे कॅप्सूलला संरक्षण

पृथ्वीच्या वातावरणात शिरल्यानंतर कॅप्सूल भोवतीचे बाहेरचे तापमान वाढत असताना 'PICA 3.0 हीट-शील्ड'ने ड्रॅगन फ्रीडमला संरक्षण दिले. दरम्यानच्या काळात अंतराळवीरांनी घातलेल्या 'स्पेस सूट्स' मधून थंड हवा खेळवली गेली, जेणेकरून त्यांच्या शरीराचे तापमान कमी राहायला मदत झाली. ड्रॅगन फ्रीडमला सोसावे लागणारे सर्वोच्च तापमान 1926.667 सेल्सियस म्हणजे 3500 फॅरनहाईट इतके होते. 'फ्रीडम कॅप्सूल' पृथ्वीच्या वातावरणातून जमिनीच्या दिशेने येत असताना मधला काही काळ कॅप्सूलसोबतचा संपर्क काही मिनिटांसाठी तुटला, त्यावेळी शास्त्रज्ञांचा श्वास पुन्हा घुटमळला. हा सामान्य प्रक्रियेचा भाग असतो, हे त्यांनाही माहीत होते. पण, काही काळाने हा संपर्क पुन्हा प्रस्थापित झाला.

### ड्रॅगन ऑटोमॅटिक मोडवर..

वातावरणात शिरण्यापूर्वी क्रू ने खिडकीच्या झडपा बंद केल्या, त्यांच्या हातातले टॅब्लेट्स आणि इतर गोष्टी ठेवून दिल्या आणि हार्नेस घट्ट केली. ड्रॅगन हे ऑटोमॅटिक मोडवर प्रवास करत होतं. म्हणजे ते स्वतःचा मार्ग स्वतः ठरवतं. क्रू यावर फक्त लक्ष ठेवून होता. 'WB57 हाय अल्टिट्यूड' विमानाद्वारे ड्रॅगन फ्रीडमच्या पृथ्वी प्रवासाची दृश्ये दिसत होती. ड्रॅगन फ्रीडम पृथ्वीच्या वातावरणात शिरल्यानंतर आपोआपच वेगवेगळ्या वेळी पॅराशूट्स उघडली गेली. पॅराशूटसची पहिली जोडी कॅप्सूल १८ हजार फुटांवर आल्यावर उघडले. तर दुसरी मुख्य जोडी साडेसहा हजार फुटांवर उघडली. यानंतर चार पॅराशूटसच्या मदतीने ड्रॅगन फ्रीडम कॅप्सूल तरंगत खाली आले. मोहीम फत्ते झाली होती, सगळे अंतराळवीर सुखरूप उतरले होते. भारतीय वेळेनुसार १९ मार्चच्या पहाटे तीन वाजून २७ मिनिटांनी स्प्लॅश डाऊन झाला.. सगळीकडे एकच जल्लोष झाला. 'वेलकम सुनीता' च्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला !

### क्रू नाईन बॅक ऑन अर्थ..

अंतराळवीरांचा स्पेस स्टेशन ते पृथ्वीवरचा प्रवास हा सुमारे १७ तासांचा होता.' क्रू नाईन बॅक ऑन अर्थ..वेलकम होम' अशी घोषणा ग्राऊंड कंट्रोलने करत अंतराळवीरांचे स्वागत केले. ड्रॅगन कॅप्सूल समुद्रात कोसळल्यानंतर पॅराशूटस ऑटोमॅटिकली कॅप्सूलपासून वेगळी झाली. असे केल्याने पॅराशूटसोबत कॅप्सूल प्रवाहात ओढली जात नाही, हे लक्षात घ्यायला हवे !

### फास्ट बोट्स तातडीने रवाना..

त्याआधी फास्ट बोट्स पोहचल्या, त्यांनी समुद्रात पडलेली पॅराशूटस गोळा केली. शिवाय समुद्रात तरंगणाऱ्या कॅप्सूलचे काही सेफ्टी चेक्सही करण्यात आले. त्यानंतर स्पेस-एक्सच्या फ्लाईट सर्जननी कॅप्सूलमधील अंतराळवीरांशी संवाद साधला. अंतराळवीरांच्या तब्येतीबद्दल जाणून घेण्यात आले.

### सुरक्षेचे सर्व नियम काटेकोर..

स्पेस-क्राफ्टच्या बाहेरच्या बाजूला समुद्राचं खारे पाणी लागल्याने या पत्र्याची झीज होते. म्हणूनच कॅप्सूलवर गोड पाणी मारून समुद्राचे पाणी काढले जाते. यानंतर ड्रॅगन कॅप्सूलच्या एका बाजूला असणारा दरवाजा 'साईड हॅच' उघडण्यात आला. पृथ्वीवरून उड्डाण करताना आत शिरण्यासाठी आणि पृथ्वीवर परतल्यानंतर अंतराळवीरांना बाहेर काढण्यासाठी या हॅचचा वापर केला जातो.

### बाहेर येण्यासाठी रॅम्पचे प्रयोजन

हॅच उघडल्यानंतर वैदयकीय टीमपैकी एकजण कॅप्सूलमध्ये गेला. तर रिकव्हरी टीमने अंतराळवीरांना बाहेर काढण्यासाठी कॅप्सूलमधून बाहेर येणारा रॅम्प बसवला. ड्रॅगन फ्रीडम कॅप्सूलमध्ये मधल्या दोन सीट्सवर बसलेल्या अंतराळवीरांना आधी बाहेर काढण्यात आले. सगळ्यात आधी 'नासा' चे अंतराळवीर निक हेग यांना बाहेर काढले गेले. त्यानंतर रशियन कॉस्मोनॉट अलेक्झांडर गोर्बोनॉव्ह, नासा अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना कॅप्सूल बाहेर काढण्यात आले.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राजधानी साताऱ्यात लवकरच होणार

# अत्याधुनिक सुविधांचे बसस्थानक!

## ना. शिवेंद्रराजे भोसले यांचा पाठपुरावा : राज्य शासनाकडून 15 कोटींचा निधी उपलब्ध

। सातारा ।

प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले यांच्या प्रयत्नांतून प्रमुख बसस्थानक हे केवळ प्रवास केंद्र न राहता साताऱ्याच्या गौरवशाली इतिहासाला साजेसं आणि आधुनिकतेने परिपूर्ण असं महत्त्वाचं 'लँडमार्क' ठरणार आहे. साताऱ्याचे बसस्थानक एअरपोर्टसदृश तयार केले जाणार असून त्याची ऐतिहासिक शैलीने रचना करण्यात येणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प फक्त बसस्थानकाचा विकास नसून तो साताऱ्याच्या शहरी व पर्यटन विकासाचा 'आधारस्तंभ' ठरणार आहे.**




सातारा हे पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर वसलेले महत्त्वाचे ऐतिहासिक शहर आहे. त्यामुळे येथे ये-जा असलेल्या हजारो प्रवाशांसाठी बसस्थानक एक महत्त्वाचा वाहतुकीचा केंद्रबिंदू ठरतो. साताऱ्याचे बसस्थानक शहर व जिल्ह्यातील ग्रामीण भागांशी तसेच आसपासच्या तालुक्यांशी संपर्क साधण्याचे मुख्य साधन आहे. साताऱ्यात अनेक शैक्षणिक संस्था, प्रशासकीय कार्यालये व न्यायालये असल्याने विद्यार्थ्यांसह, अधिकारी, कर्मचारी यांच्या दैनंदिन प्रवासासाठी सातारा बसस्थानक महत्त्वाचे ठरते. सातारा जिल्ह्यासह शहर परिसरात अजिंक्यतारा किल्ला, सज्जनगड, ठोसेघर धबधबा, कास पठार, महाबळेश्वर, पाचगणी ही महत्त्वाची पर्यटनस्थळे आहेत. त्यामुळे पर्यटन प्रवाशांसाठी हे बसस्थानक प्रवेशद्वाराचेच काम करते. व्यापारी, शेतकरी, विक्रेते यांच्यासाठी बससेवा ही जीवनरेषा आहे. वस्तूंची व लोकांची वाहतूक सुलभ होते. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते.

साताऱ्याहून महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, कोल्हापूर, सोलापूर अशी प्रमुख शहरे तसेच शेजारील राज्यांमध्येही बससेवा उपलब्ध असल्याने शहराची उंची वाढली आहे. सातारा बसस्थानकातून दररोज शेकडो एसटी बसेसमधून हजारो प्रवासी प्रवास करत असतात. सातारा मध्यवर्ती बसस्थानकाची पर्यावरणपूरक रचना असेल. सौरऊर्जेचा वापर, पावसाचे पाणी संकलन व जलपुनर्वापर, कचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. उत्तम वायूविजन राहिल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. हे बसस्थानक पर्यावरणपूरकतेचा आदर्शही निर्माण करणार आहे.

### बसस्थानकाच्या मध्यभागी 'दीपस्तंभ'

सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या आग्रहाखातर या बसस्थानकास ऐतिहासिक लूक देण्यात येणार आहे. या बसस्थानकाची रचना खास साताऱ्याच्या ऐतिहासिक प्रेरणेतून घेण्यात आली आहे. बसस्थानकाच्या मध्यभागी 'दीपस्तंभ' उभारण्यात येणार आहे. या अनोख्या डिझाईनमुळे प्रवाशांना राजेशाही वातावरणाचा अनुभव येणार आहे. हे बसस्थानक फक्त सोयीसाठी नसेल, तर इतिहासाशी जोडणारा एक भावनिक दुवा ठरणार आहे. या बसस्थानक परिसरात लावण्यात येणाऱ्या लाईट व त्यामध्ये सण, उत्सवानुसार बदलणारे लायटिंग असेल.

> सातारा बसस्थानक हे सातारा जिल्हावासीयांसाठी मध्यवर्ती ठिकाण आहे. गेली अनेक वर्षे सातारकरांची इच्छा होती या बसस्थानकाचे रूपडे पालटावे. त्यामुळे अभ्यासकांशी चर्चा करून बसस्थानकाला वेगळे रूप देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मात्र, केवळ शोभनीयतेकडे न पाहता प्रवाशांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत याचाही प्रकल्पामध्ये अंतर्भाव केला आहे. सर्वसामान्य जनतेसाठी हे बसस्थानक निश्चितपणे सोयीचे आणि आकर्षक ठरेल याची मला खात्री आहे.
>
> **–ना. शिवेंद्रराजे भोसले,**
> सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य

### सातारा बसस्थानक विकास प्रकल्प...

सातारा बसस्थनक विकास प्रकल्पासाठी सुमारे 15 कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासन खर्च करणार आहे. एमएसआरडीसीकडून लवकरच या कामास सुरूवात करण्यात येणार आहे. सातारा मध्यवर्ती बसस्थानकाच्या विकासामुळे स्थानिक व्यापारी, फेरीवाले, वाहतूकदार, टॅक्सी चालक, फूड स्टॉलचालक यांना अधिक संधी उपलब्ध होणार आहे. नव्याने बांधण्यात येणाऱ्या बसस्थानकात व्यवसायिकांना 13 शॉप्स उपलब्ध करून दिले जाणार आहेत. पर्यटन, व्यवसाय व शिक्षणासाठी येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढणार असून त्याचा थेट लाभा साताऱ्याच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे.

# आदित्य ठाकरेंचा अंगुलीनिर्देश कुणाकडे?

## प्रतीकात्मक पुतळा जाळून हिंदू संघटनांचे आंदोलन

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**१७ मार्चला नागपूरमध्ये दंगल झाली. औरंगजेबाची कबर खुलताबाद या ठिकाणाहून हटवली पाहिजे अशी मागणी करत काही हिंदू संघटनांनी प्रतीकात्मक पुतळा जाळून आंदोलन केलं. त्यानंतर दोन गटांमध्ये दंगल झाल्याचं पाहण्यास मिळालं. यामध्ये पोलीसही जखमी झाले. यावरुन आता आदित्य ठाकरेंनी एक वक्तव्य केलं आहे.**



नागपूरच्या महालमधील झेंडा चौकात दोन गटांत झालेल्या संघर्षानंतर १७ मार्चला मोठी जाळपोळ आणि गाड्यांची तोडफोड झाली होती. यावेळी जमावाला पांगवताना एका गटातील लोकांनी पोलिसांवर दगडफेक केली.त्या गटावर अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडून जमाव पांगवला. दरम्यान या घटनेत काही पोलीस कर्मचारीही जखमी झाले आहेत.दरम्यान १८ मार्चला विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर हिंसाचार प्रकरणी निवेदन देले आहे. ते म्हणाले, " १७ मार्च रोजी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाची कबर हटवावी असे नारे दिले. यावेळी त्यांनी औरंगजेबाची प्रतीकात्मक कबर जाळली. यानंतर गणेशपेठ पोलिसांनी आंदोलकांवर विविध कलमांतर्गत दुपारी गुन्हे दाखल केले."यानंतर संध्याकाळी, सकाळी जाळलेल्या प्रतीकात्मक कबरीवरील कापडावर धार्मिक मजकूर होता अशी अफवा परवण्यात आली. त्यानंतर चितार ओळमधील नमाज आटोपून २०० ते २५० लोकांच्या जमावाने घोषणाबाजी सुरू केली. याच लोकांनी आग लावून टाकू असे हिंसक बोलणे केल्याने पोलिसांनी त्याठिकाणी बळाचा वापर केला." अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. दरम्यान ही दंगल सरकारमधल्याच काही घटकांनी घडवून आणली का? असा सवाल आता आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला आहे. नागपूरमध्ये जी दंगल झाली आहे त्यामागे कोण आहे? याचा आम्ही विचार करत आहोत. याच सरकारमध्ये असे काही घटक आहेत का? ज्यांना मुख्यमंत्री हे गृहमंत्री म्हणून अपयशी आहेत असं दाखवायचं आहे? या सगळ्याच्या मुळाशी कोण आहे? याचा विचार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करायला पाहिजे असं आदित्य ठाकरेंनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात त्यांच्याच सरकारमधले काही घटक काम करत आहेत का? हा विचार त्यांनी केला पाहिजे या आशयाचं वक्तव्य आदित्य ठाकरेंनी केलं.

### नेमकी काय अफवा पसरली होती?

आता आदित्य ठाकरे यांचा अंगुलीनिर्देश नेमका कुणाकडे आहे? याची चर्चा सुरु झाली आहे.अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर हिंसाचार प्रकरणी निवेदन देले आहे. ते म्हणाले, " १७ मार्च रोजी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेबाची कबर हटवावी असे नारे दिले.

# छत्तीसगडमध्ये 30 नक्षलवादी ठार!

## बीजापूरमध्ये 26 तर कांकेरमध्ये 4 नक्षलवादी ठार

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

छत्तीसगडमधील बीजापूर आणि कांकेर या दोन ठिकाणी झालेल्या चकमकीत ३० नक्षलवादी ठार झाले. बीजापूरमध्ये २६ आणि कांकेरमध्ये ४ नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा पथकांनी गुरुवार २० मार्च २०२५ रोज सकाळी सात वाजल्यापासूनच नक्षलवाद्यांविरोधात कारवाई सुरू केली. या कारवाईद्वारे सुरक्षा पथकांनी नक्षलवाद्यांना मोठा दणका दिला. एक चकमक बीजापूर – दंतेवाडा सीमेजवळच्या जंगलात बीजापूरमध्ये तर दुसरी चकमक कांकेरमध्ये झाली. दिवसभरात झालेल्या दोन चकमकींपैकी एका चकमकीत एक जवान हुतात्मा झाला.



छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या दोघांनी सुरक्षा पथकांचे त्यांच्या कामगिरीसाठी कौतुक केले आहे. छत्तीसगडमधील बस्तर भागात गुरुवारी झालेल्या दोन चकमकीत एक जवान आणि 30 नक्षलवादी ठार झाले आहेत. दंतेवाडा सीमेजवळील विजापूर जिल्ह्यातील गंगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात नक्षलवादी सल्याची माहिती मिळाली होती. याआधारे सुरक्षा दलांनी सकाळी ७ वाजता कारवाई सुरू केली तेव्हा पहिली चकमक झाली. बस्तर रेंजचे आयजीपी सुंदरराज पी यांनी सांगितले की, दांतेवाडाच्या सीमेजवळ बिजापूर जिल्हातील गंगालूर ठाण्याअंतर्गत येणाऱ्या जंगल परिसरात नक्षलवादी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. सुरक्षा दलाच्या शोधमोहिमदरम्यान सकाळी सात वाजता चकमक सुरू झाली. अनेक तास अधूनमधून गोळीबार सुरू होता. गोळीबारात विजापूर जिल्हा रिझर्व्ह गार्डचा (डीआरजी) एक जवान शहीद झाला आहे. १८ नक्षलवादी मारले गेले आहेत. आम्ही स्फोटके आणि शस्त्रे जप्त केली आहेत. शोध मोहीम सुरू आहे, असे अधिकाऱ्याने पुढे बोलताना सांगितले. बस्तर भागातील नारायणपूर आणि कांकेर जिल्ह्यामध्ये दुसऱ्या एका चकमकीत 12 नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे.

या भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई सुरू करण्यात आली, कांकेर जिल्ह्यातील डीआरजी आणि बीएसएफच्या संयुक्त दलांना मोहिमेसाठी रवाना झाले होते, अशी माहिती असे कांकेर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक आय कल्याण एलेसेला यांनी दिली. छोटेबेठिया पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या कोरोस्कोडो गावाजवळ ही चकमक झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. गोळीबारात ठार झालेल्या चार नक्षलवाद्यांकडून एक ऑटोमॅटिक रायफल आणि इतर शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत, असेही त्यांनी सांगितले.छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या दोघांनी सुरक्षा पथकांचे त्यांच्या कामगिरीसाठी कौतुक केले आहे. छत्तीसगडमधील बस्तर भागात गुरुवारी झालेल्या दोन चकमकीत एक जवान आणि 30 नक्षलवादी ठार झाले आहेत. दंतेवाडा सीमेजवळील विजापूर जिल्ह्यातील गंगलूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात नक्षलवादी सल्याची माहिती मिळाली होती. याआधारे सुरक्षा दलांनी सकाळी ७ वाजता कारवाई सुरू केली तेव्हा पहिली चकमक झाली. बस्तर रेंजचे आयजीपी सुंदरराज पी यांनी सांगितले की, दांतेवाडाच्या सीमेजवळ बिजापूर जिल्हातील गंगालूर ठाण्याअंतर्गत येणाऱ्या जंगल परिसरात नक्षलवादी असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. सुरक्षा दलाच्या शोधमोहिमदरम्यान सकाळी सात वाजता चकमक सुरू झाली. अनेक तास अधूनमधून गोळीबार सुरू होता. गोळीबारात विजापूर जिल्हा रिझर्व्ह गार्डचा (डीआरजी) एक जवान शहीद झाला आहे. १८ नक्षलवादी मारले गेले आहेत.

### स्फोटके आणि शस्त्रे जप्त

आम्ही स्फोटके आणि शस्त्रे जप्त केली आहेत. शोध मोहीम सुरू आहे, असे अधिकाऱ्याने पुढे बोलताना सांगितले. बस्तर भागातील नारायणपूर आणि कांकेर जिल्ह्यामध्ये दुसऱ्या एका चकमकीत 12 नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे. या भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई सुरू करण्यात आली.

---

# सक्षम महिलांनी पोटगी मागू नये!

## पत्नी फक्त पतीकडून पोटगी मिळवण्यासाठी बेरोजगार राहू शकत नाही

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

दिल्ली उच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणी वेळी महत्वाची टिप्पणी केली आहे. सक्षम महिलांनी पतीकडून पोटगी मागू नये, नोकरीचा योग्य अनुभव असलेली सुशिक्षित पत्नी फक्त पतीकडून पोटगी मिळवण्यासाठी बेरोजगार राहू शकत नाही, असं दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटलं आहे.




उच्च न्यायालयात अंतरिम पोटगी मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणारी एक याचिका दाखल करण्यात आली होती. पत्नीने दाखल केलेली ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. तसेच कमावण्याची क्षमता असलेल्या सक्षम महिलांनी पोटगी मागू नये, अशी महत्वाची टिप्पणी केली. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयावर स्पष्टीकरण देखील दिलं. कायदा आळशीपणाला प्रोत्साहन देत नाही आणि कमाईची क्षमता असलेल्या पात्र महिलांनी त्यांच्या पतींकडून अंतरिम पोटगीसाठी दावा देखील करू नये. कायद्याचे उद्दिष्ट हे समानतेचे असून आळशीपणाला प्रोत्साहन देणे नाही. तसेच विभक्त पतीकडून अंतरिम पोटगीसाठी महिलेची याचिका न्यायालयाने फेटाळली.

या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. दरम्यान, न्यायमूर्ती चंद्र धारी सिंह यांनी म्हटलं की, सीआरपीसीच्या कलम १२५ (पत्नी, मुले आणि पालकांच्या पालनपोषणाचा आदेश) मध्ये पती-पत्नींमध्ये समानता राखण्याचा आणि पत्नी, मुले आणि पालकांना संरक्षण देण्याचा कायदेशीर हेतू आहे. मात्र, आळशीपणाला प्रोत्साहन दिलेला नाही. या आदेशाने एका महिलेने तिच्या विभक्त पतीकडून अंतरिम पोटगी नाकारण्याच्या कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध केलेली याचिका फेटाळून लावली. सुशिक्षित पत्नीला जर योग्य फायदेशीर नोकरीचा अनुभव असेल, तर तिने फक्त पतीकडून पोटगी मिळवण्यासाठी निष्क्रिय राहू नये. सध्याच्या प्रकरणात अंतरिम पोटगीला परावृत्त केलं जात असल्याचं दिसून येत आहे. कारण या न्यायालयाला याचिकाकर्त्यामध्ये कमाई करण्याची आणि तिच्या शिक्षणाचा फायदा घेण्याची क्षमता दिसत असल्याचं उच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

### महिलेला दिलासा देण्यास नकार

डिसेंबर २०१९ मध्ये एका जोडप्याने लग्न केलं होतं आणि ते सिंगापूरला निघून गेले होते. पण महिलेने आरोप केला की, तिच्यापासून दूर राहिलेल्या पती आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी तिच्यावर केलेल्या छळामुळे ती फेब्रुवारी २०२१ मध्ये भारतात परतली. तिने भारतात परतण्यासाठी तिचे दागिने विकल्याचा दावा केला .

# सोनू निगमसमोर पोलिस महिलेने गायलं गाणं

गायक सोनू निगमच्या आवाजाची जादू प्रेक्षकांनी अनेकदा अनुभवली आहे. त्याची काही गाणी तर इतकी लोकप्रिय आहेत की, ती चाहत्यांच्या अगदी तोंडपाठ आहेत. 'कल हो ना हो', 'अभी मुझ में कहीं' या आणि अशा अनेक गाण्यांनी प्रेक्षकांना भुरळ घातली आहे. बॉलीवूडमध्ये त्याने अनेक सुपरहिट गाणी गायली आहेत. सोनू निगम हा केवळ गायकच नाही तर तो उत्तम माणूस असल्याचेही अनेकदा पाहायला मिळालं आहे. त्याच्या गाण्याचे अनेक लाईव्ह शोज होत असतात आणि या लाईव्ह शोजमधून सोनू निगम रसिकांना मंत्रमुग्ध करतो. सोनू निगमच्या कॉन्सर्टमध्येही लोक गर्दी करतात. त्याचे असंख्य चाहते त्याला भेटण्यासाठी नेहमी उत्सुक असतात, तर सोनू निगमही शक्य तितक्या चाहत्यांना भेटण्याचा प्रयत्न करतो. आपल्या गाण्याने चर्चेत राहणारा सोनू निगम सोशल मीडियावरही तितकाच सक्रिय असतो. सोशल मीडियावर तो त्याच्या गाण्याचे अनेक



व्हिडीओ शेअर करत असतो. तसंच त्याच्या लाईव्ह शोमधील गायनाचेही अनेक व्हिडीओ तो शेअर करत असतो. अशातच त्याने नुकताच शेअर केलेला व्हिडीओ चर्चेत आहे.सोनू निगमने त्याच्या सोशल मीडियावर एका महिला चाहतीचा व्हिडीओ शेअर केला आहे आणि ही महिला चाहती पोलिस आहे. या व्हिडीओमध्ये महिला पोलिस सोनू निगमसमोर गाणं सादर करत आहे, तर सोनू निगमही तिला गाणं गाण्यात साथ देत आहे. सोनू निगमसमोर गाणं गातानाचा आनंद तिच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत आहे. त्याचवेळी ती महिला पोलिस सोनू निगमसमोर काहीशी भावूक झाल्याचेही पहायला मिळत आहे.

## रणवीरच्या अडचणीत वाढ

गेल्या काही दिवसांपासून देशभरात 'इंडियाज गॉट लेटेंट' मधील आक्षेपार्ह विधानांमुळे रणवीर अलाहाबादीया हे नाव चर्चेत आहे. युट्यूबर आणि कॉमेडियन समय रैनाचा 'इंडियाज गॉट लेटेंट' हा कार्यक्रम लोकप्रिय आहे. मात्र, या कार्यक्रमात यूट्यूबर आणि पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाने एका स्पर्धकाला आक्षेपार्ह प्रश्न विचारल्याने तो वादात सापडला आहे. यावरून सोशल मीडिया वापरकर्त्यांसह विविध क्षेत्रातील लोकांकडून टीका करण्यात आली आहे. यावरून रणवीर अलाहाबादियाने माफी देखील मागितली. मात्र, आता रणवीर अलाहाबादियाला महाराष्ट्र सायबर सेलने २४ फेब्रुवारीला हजर राहण्यासाठी समन्स बजावल्याची माहिती समोर आली आहे. रणवीर अलाहाबादियाने 'इंडियाज गॉट लेटेंट' या वेब शोमध्ये पालक आणि लैंगिक संबंधांबद्दल केलेल्या वक्तव्यानंतर रणवीर अलाहाबादिया आणि इतरांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्याचा तपास एजन्सींकडून करण्यात येत आहे. रणवीर अलाहबादियाने केलेल्या वादग्रस्त विधानानंतर महाराष्ट्र सायबर विभागाने गुन्हा दाखल केल्यानंतर या प्रकरणातील अनेकांना चौकशीसाठी समन्स बजावले आहेत.

## रुचिराकडून संतोषचं कौतुक



छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर आधारित 'छावा' (CHHAAVA) चित्रपटात मराठी अभिनेता संतोष जुवेकरने (SANTOSH JUVEKAR) रायाजी ही भूमिका केली आहे. सेटवर औरंगजेबाच्या भूमिकेत असलेल्या अक्षय खन्नाशी न बोलल्याचं वक्तव्य संतोषने केलं होतं. त्यावरून त्याला ट्रोल केलं जात आहे. या ट्रोलिंगवर स्वत: संतोष जुवेकरने त्याची प्रतिक्रिया दिली आहे. अशातच आता अभिनेत्री रुचिरा जाधवनेही (RUCHIRA JADHAV) त्याच्यावरील ट्रोलिंगबद्दल मत व्यक्त केलं आहे. अभिनेत्रीने संतोषचं नाव न घेता आपलं मत मांडलं आहे. इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करत तिने आपली भूमिका स्पष्ट केली आहे आणि काही मुद्देदेखील उपस्थित केले आहेत.रुचिराने असं म्हटलं आहे की, "गेल्या बऱ्याच दिवसापासून मी सोशल मीडियावर एक गोष्ट बघत आहे. मला कळत नाही आपला मराठी कलाकार एक छान बॉलीवूडचा चित्रपट करतो. त्यात छान अभिनय करतो. खरंतर त्याचं ते काम आहे. ही काही वेगळी गोष्ट नाही. त्याचं काम तो करतो आणि मनापासून करतो. तो चित्रपटही आपल्याला आवडतो आणि चित्रपटानंतर प्रोटोकॉलनुसार तो काही मुलाखती देतो. ज्यात त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांचीही तो छान उत्तरं देतो. एक नाही तर कधी कधी अनेक मुलाखती असतात, त्यामुळे सारखाच प्रश्न आणि सारखीच उत्तरं असू शकतात. त्यामुळे तो त्याचं काम करतो"यापुढे रुचिरा म्हणते की, "सुरुवातीला त्याच्या कामाचं कौतुक होतं आणि पण काही वेळाने त्या कौतुकाचं रुपांतर होतं ते ट्रोल्समध्ये. ते ट्रोल्सपर्यंतसुद्धा ठीक होतं. मीम किंवा काही मजामस्ती म्हणून ते ठीक होतं. पण नंतर त्याची इतकी हद्द पार होते की, एकाने काही पोस्ट टाकल्यानंतर दहा जण तेच टाकतात. सलग-सलग त्याच गोष्टी येतात आणि ते बघून असं वाटतं की, तुमच्याकडे इतका वेळ आहे का? जे कुणी हे सगळं करत आहेत त्यांच्याकडे इतका वेळ आहे का? की त्या एका व्यक्तीबद्दल वाईट बोलावं. असं काय एवढं केलं आहे त्याने की, त्याच्याबद्दल तुम्ही इतक्या खालच्या पातळीला जाऊन बोलत आहात. कशासाठी? जगात मुद्दे नाहीत का?"

## सिद्धार्थ जाधव 41 कोटींचा मालक आहे?

मराठीसह हिंदी चित्रपटात काम करत अभिनयाची छाप उमटवणारा अभिनेता म्हणून सिद्धार्थ जाधवची ओळख आहे. अभिनेत्याने २००४ मध्ये 'अगं बाई अरेच्छा' या चित्रपटातून अभिनेत्याने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. बकुळा नामदेव घोटाळे या चित्रपटात अभिनेत्याला प्रमुख भूमिका मिळाली. सिद्धार्थ जाधवने आतापर्यंत अनेक मराठी चित्रपटात काम केले आहे. ज्यामध्ये 'जत्रा', 'साडे माडे तीन', 'बकुळा नामदेव घोटाळे', 'दे धक्का', 'बाप रे बाप डोक्याला ताप', 'गोलमाल रिटर्न्स', 'इरादा पक्का', 'खो खो', 'हुप्पा हुय्या', 'क्षणभर विश्रांती', 'शासन', 'रझाकार', 'शिकारी', 'सर्कस', 'नवरा माझा नवसाचा २', अशा अनेक चित्रपटात अभिनेता महत्वाच्या भूमिकेत दिसला आहे. सिद्धार्थ जाधव हा त्याच्या विनोदाच्या अचूक टायमिंगसाठी ओळखला जातो. प्रेक्षकांना खळखळून हसणारा हा अभिनेता आता त्याच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आला आहे. एका मुलाखतीत त्याने तो खरंच ४१ कोटी संपत्तीचा मालक आहे का, यावर खुलासा केला आहे.अभिनेता सिद्धार्थ जाधवने नुकतीच अमोल परचुरेंच्या 'कॅचअप' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. त्यावेळी त्याला विचारण्यात आले की, कुठेतरी वाचनात आलं होतं की तू ४१ कोटींचा मालक आहेस. यावर अभिनेत्याने हसून उत्तर दिले. सिद्धार्थ जाधव म्हणाला, "मी माझ्या पूर्ण कारकिर्दीत ४१ कोटी कोट्या केल्या असतील." पुढे अभिनेता म्हणाला, "जे काही कमवलंय या २५ वर्षात किंवा इतक्या वर्षात ते ४१ कोटींच्या पलीकडचं आहे.

## मालिकेत एकमेकींविरोधात असणाऱ्या पारू-दिशाने अशी साजरी केली रंगपंचमी

'लागिरं झालं जी' मालिकेत जयश्रीची भूमिका साकारत अभिनेत्री पूर्वा शिंदे(PURVA SHINDE) घराघरांत पोहोचली. अभिनेत्री सध्या पारू मालिकेत काम करताना दिसत आहे. पूर्वा शिंदेने या मालिकेत खलनायिकेची भूमिका साकारली आहे. दिशा असे तिच्या पात्राचे नाव आहे. विशेष बाब म्हणजे पूर्वा शिंदेने साकारलेले खलनायिकेचे पात्र लोकप्रिय ठरताना दिसत आहे. किर्लोस्करांना त्रास देण्यासाठी ही दिशा आता कोणत्या पातळीला जाऊ शकते, कट-कारस्थान करू शकते. पारूवर तिचा विशेष राग असल्याचे दिसते, कारण पारू तिला तिच्या योजनांमधून यशस्वी होऊ देत नाही. दिशा अनेकदा दामिनीची मदत घेत असते. दामिनीला पारू आवडत नसल्याने तीदेखील अनेकदा दिशाला मदत करते. तर कधी दिशाविरूद्धही बोलते. मालिकेतून प्रेक्षकांचे मनोरंजन



करणाऱ्या या अभिनेत्री सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रेक्षकांच्या भेटीला येत असतात. पूर्वा शिंदेने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये तिच्याबरोबर पारूच्या भूमिकेत दिसणारी अभिनेत्री शरयू सोनावणे, दामिनीच्या भूमिकेत दिसणारी श्रुतकिर्ती रणजीत आणि प्रियाच्या भूमिकेत दिसणारी अभिनेत्री संजना काळे दिसत आहेत. या व्हिडीओत अभिनेत्रींनी एकमेकींना रंग लावत रंगपंचमी साजरी केल्याचे पाहायला मिळत आहे. त्या एकमेकींना रंग लावत मजा करताना दिसत आहेत.

# चहल-धनश्रीच्या घटस्फोटावर शिक्कामोर्तब!

## चहल-धनश्री 4 वर्ष आणि 3 महिन्यांनंतर दोघेही विभक्त झाले

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या बऱ्याच महिन्यांपासून भारताचा क्रिकेटपटू युझवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांच्या घटस्फोटाच्या चर्चांनी वेग धरला होता. पण आता युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा दोघांच्या संमतीने घटस्फोट झाल्याचे वकिलांनी माहिती दिली आहे. आज २० मार्च रोजी धनश्री-चहलच्या घटस्फोटाची सुनावणी होती, त्यानंतर या दोघांचाही आता घटस्फोट झाला आहे.**




चहल आणि धनश्री दोघांनी वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला होता. आता गुरुवारी, २० मार्च रोजी कौटुंबिक न्यायालयाने दोघांचे घटस्फोटाचे अपील मंजूर केले आहे. यासह ४ वर्ष आणि ३ महिन्यांनंतर दोघेही विभक्त झाले आहेत.गुरुवारी २० मार्च रोजी मुंबईच्या वांद्रे फॅमिली कोर्टाने घटस्फोटावर अंतिम निर्णय दिला. या सुनावणीसाठी चहल आणि धनश्री पोहोचले होते. चहल प्रथम काळे जॅकेट आणि मास्क घालून त्याच्या वकिलांसह पोहोचला. काही वेळाने धनश्री पांढरा टी-शर्ट घालून पोहोतली. तर तिनेही चेहऱ्यावर मास्क लावला होता. या दोघांचे व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत होते. मुंबई फॅमिली कोर्टाने युझवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा घटस्फोट मंजूर केला आहे. युझवेंद्र चहलचे वकिल नितीन गुप्ता यांनी चहल आणि धनश्री यांचा घटस्फोट झाल्याचे सांगितले. वकिल म्हणाले, “दोघांचेही लग्न संपुष्टात आले आहे. दोन्ही पक्षांचा आता अधिकृतपणे घटस्फोट झाला आहे आणि आता ते दोघेही पती-पत्नी नाहीत. त्यांची संयुक्त याचिका स्वीकारण्यात आली आहे.”चहल आणि धनश्री २४ डिसेंबर २०२० रोजी विवाहबंधनात अडकले होते. तीन-चार महिन्यांपूर्वी त्यांच्या नात्यात दुरावा आल्याच्या बातम्या येऊ लागल्या. दरम्यान त्यांनी इन्स्टाग्रामवर एकमेकांना अनफॉलो केले, तर एकमेकांचे फोटोही त्यांनी सोशल मीडियावरून डिलीट केले होते. अफवा सुरू असतानाच गेल्या महिन्यातच घटस्फोटाची प्रक्रिया सुरू झाल्याचे समोर आले आणि आज २० मार्चला अखेरीस त्यांच्या घटस्फोटावर शिक्कामोर्तब झाला.भारतीय संघाचा अनुभवी गोलंदाज युजवेंद्र चहल त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा हे विभक्त झाल्याच्या आणि त्यांच्या घटस्फोटाच्या बातम्या रोज येत आहेत. दरम्यान मुंबई उच्च न्यायालय आज या प्रकरणी निर्णय देणार आहे. ज्यासाठी चहल कोर्टात पोहोचला आहे.

### परस्पर संमतीने घटस्फोट

क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा हे त्यांच्या घटस्फोटाच्या अर्जावर सुनावणीसाठी गुरुवारी, २० मार्च रोजी मुंबईतील वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात पोहोचले. इंडियन प्रीमियर लीग २०२५ सुरू होण्याच्या दोन दिवस आधी चहल मास्क घालून कोर्टाच्या आवारात प्रवेश करताना दिसला. चहल आणि धनश्री दोघेही घाईघाईने आत जात असताना व्हीडिओमध्ये दिसत आहेत. बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाने कुटुंब न्यायालयाला आयपीएल २०२५ मध्ये खेळणार असल्याने २० मार्चपर्यंत खटल्याचा निकाल देण्याचे निर्देश दिल्यानंतर चहल चंदीगडवरून मुंबईत आला आणि गुरुवारी दुपारी न्यायालयात पोहोचला. सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी त्याने पंजाब किंग्सच्या सराव सत्रातून ब्रेक घेतला आहे.चहल आणि धनश्री यांनी ५ फेब्रुवारी रोजी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता.

# भारतीय संघाला कोट्यवधींचं बक्षीस

## बीसीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफी विजेत्या टीम इंडियावर केला पैशांचा वर्षाव

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाने अंतिम सामन्यात न्यूझीलंड संघाचा पराभव चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या करंडकावर आपलं नाव कोरलं. भारतीय संघाने या विजयासह विक्रमी तिसऱ्यांदा ही ट्रॉफी पटकावली आहे, जी एक ऐतिहासिक कामगिरी आहे. हा ऐतिहासिक विजय साजरा करण्यासाठी बीसीसीआयने संपूर्ण संघावर पैशांचा वर्षाव केला आहे. बीसीसीआयने आज २० मार्च रोजी विजेत्या भारतीय संघासाठी बक्षिसाची रक्कम जाहीर केली.**



रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत संपूर्ण स्पर्धेत अजिंक्य राहत जेतेपदावर कब्जा केला. विराट कोहली, श्रेयस अय्यर, कुलदीप यादव आणि वरुण चक्रवर्ती हे भारतासाठी सर्वात मोठे हिरो ठरले आणि या खेळाडूंनी विजेतेपद मिळवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तर कर्णधार रोहित शर्माची अंतिम सामन्यातील खेळी मॅचविनिंग ठरली.भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआयने आज २० मार्च रोजी खेळाडू आणि कोचिंग स्टाफसह स्पर्धेशी संबंधित सर्व संघ सदस्यांना ५८ कोटी रुपयांची बक्षिसाची रक्कम जाहीर केली आहे. ही बक्षीस रक्कम खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ आणि निवड समिती सदस्यांना सन्मानित करण्यासाठी जाहीर करण्यात आली आहे.बीसीसीआयने बक्षीस जाहीर करण्यासाठी एक निवेदन जारी केले. या निवेदनात म्हटले आहे की, ‘आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील विजयानंतर टीम इंडियासाठी ५८ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करताना बीसीसीआयला आनंद होत आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ आणि निवड समितीच्या सदस्यांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे.बोर्डाने आपल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताने स्पर्धेत आपला दबदबा कायम राखला. भारतीय संघाने चार दमदार विजयांसह अंतिम फेरी गाठली. संघाने आपल्या मोहिमेची सुरुवात बांगलादेशविरुद्ध ६ विकेट्सने विजय मिळवून केली. त्यानंतर पाकिस्तानविरुद्ध नेत्रदीपक विजय नोंदवला.

### 58 कोटी रुपयांचे रोख बक्षीस

त्यांनी न्यूझीलंडचा ४४ धावांनी पराभव करून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आणि अखेर उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचा ४ गडी राखून पराभव केला.गेल्या वर्षी भारतीय संघाने १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यावेळीही बीसीसीआयने टीम इंडियाच्या खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी आपली तिजोरी उघडली होती. रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील संघासाठी बोर्डाने १२५ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. ही बक्षिसाची रक्कम सर्व खेळाडू, निवडकर्ते, प्रशिक्षक आणि सपोर्टिंग स्टाफमध्ये वाटण्यात आले..भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआयने आज २० मार्च रोजी खेळाडू आणि कोचिंग स्टाफसह स्पर्धेशी संबंधित सर्व संघ सदस्यांना ५८ कोटी रुपयांची बक्षिसाची रक्कम जाहीर केली आहे. ही बक्षीस रक्कम खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ आणि निवड समिती सदस्यांना सन्मानित करण्यासाठी जाहीर करण्यात आली आहे.बीसीसीआयने बक्षीस जाहीर करण्यासाठी एक निवेदन जारी केले. या निवेदनात म्हटले आहे की, ‘आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधील विजयानंतर टीम इंडियासाठी ५८ कोटी रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करताना बीसीसीआयला आनंद होत आहे. खेळाडू, प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ आणि निवड समितीच्या सदस्यांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार।
। दि. 21 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंटपदी निवड

## पिंपळे गुरवच्या चिंतामण बुरसे यांचे यश; महापालिकेत अतिरिक्त आयुक्तांच्या हस्ते सन्मान

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशसेवेसाठी लहानपणापासून भारतीय सैन्यात अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगत वयाच्या अवघ्या २३ व्या वर्षी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड झालेल्या पिंपळे गुरव येथील चिंतामण विष्णू बुरसे यांचा महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**



पिंपरी चिंचवड शहरातील देशसेवेत सहभागी होणा-या युवकांमुळे शहराच्या लौकिकात भर पडली असून अशा युवकांचा अभिमान वाटत असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, चिंतामण बुरसे यांचे वडील विष्णू बुरसे,आई स्वाती बुरसे, विद्युत विभागातील प्रशांत जोशी हे उपस्थित होते. चिंतामणला आठवीत असल्यापासून भारतीय सैन्याचे पोस्टर्स पाहून भारतीय सैन्यात भरती होण्याची आवड निर्माण झाली. तेच ध्येय मनाशी बांधून त्याने सैन्यात भारती होण्याचे सातत्याने प्रयत्न केले. एनडीए येथे निवड होण्यासाठी तीन वेळेस लेखी परीक्षा दिली परंतु मुलाखतीमध्ये निवड झाली नाही अशा परिस्थितीतून स्वत:चा आत्मविश्वास ढळू न देता चिंतामणने पुन्हा जोमाने अभ्यास करत एनसीसी कोट्यातून परीक्षा दिली. त्यामध्ये त्याची लेफ्टनंट पदी निवड झाली.

चेन्नई येथे ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी येथे त्यांनी तीन महिन्यांचे खडतर प्रशिक्षण देखील पूर्ण केले आहे. लवकरच ते ग्वाल्हेर येथे भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट म्हणून ते रुजू होणार आहे.

> चिंतामणला लहानपणापासून सैन्यात भरती होण्याची इच्छा होती. आम्ही देखील कायम त्याला पाठींबा दिला. अनेकदा अपयश येऊन देखील त्याने मेहनतीने त्यांचा सामना करत आपले स्वप्न पूर्ण केले.
>
> –स्वाती बुरसे




BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Not just education, but
Personality
transformation.
ADMISSIONS OPEN for 2025-26
• CBSE curriculum
• Initiatives like 'Read-to-Lead'
• Tradition of 100% result
Gayatri English Medium School & Junior College, Charholi
95277 64646 / 77967 67292


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा
₹ १३००/-
'C++' भाषा
₹ १३००/-
बेसिक जावा
₹ १३००/-
स्क्रॅच
ॲनिमेशन
₹ १३००/-
बेसिक टॅली
₹ १५००/-
एम.एस.
ऑफिस
₹ १५००/-
कोरल ड्रॉ
₹ ११००/-
Adobe AB
फोटोशॉप
₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर
शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा.
अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100


EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org